# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/04/2023 (शनिवार) सायंकाळ

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १५ किमी अंतरावर खापा ते पाटणसावंगी रोड रेल्वे फाटकाजवळ सावनेर दिनांक २८.०४.२०२३ चे ०७.०० वा. ते ७/३० वा. दरम्यान सावनेर पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, खापा ते पाटणसावंगी रोड रेल्वे फाटकाजवळ काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– १) रतनलाल भज्जु यादव, रा. सावनेर २) निखील राजेश कोचे दोन्ही रा. मध्यप्रदेश** यांनी संगणमत करुन स्वत:चे आर्थिक फायदयासाठी महाराष्ट्र राज्यात गौवंश हत्याबंदी असतांना कोणत्याही प्रकारचा जनावर वाहतुकीचा परवाना व जनावर खरेदी पावती न बाळगता यातील आरोपीतांनी आपल्या ताब्यातील बोलेरो पिकअप क्र. एम एच– ४० सि डी –६०९८ किंमती अंदाजे ८०००००/–रु चे वाहनामध्ये ०४ नग म्हशी प्रत्येकी किंमती ३००००/– रु प्रमाणे एकुण किंमती अंदाजे १२००००/–रु, १ नग हेला किंमती अंदाजे २५०००/–रू. असा एकुण ९४५०००/– रुपयाचा मुद्देमाल अत्यंत क्रुर व निर्दयतेने डांबुन त्यांना आखुड दोरीने बांधुन त्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता अपुऱ्या जागेत दाटीवाटीने कोंबुन अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतुक करतांना भरधाव वेगाने निष्काळजीपणाने वाहन चालवितांना मिळुन आल्याने नमुद वाहन चालक व त्याचा साथीदार यांचे विरूद्ध कायदेशीर कार्यवाही करून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोना रंजन दयारामजी कांबळे ब. नं. २१६० पो स्टे सावनेर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम २७९, ३४ भादवी ३, 11(1)(g),11(1)(d), 11(1)(c) प्रा छ प्र अधि ५ अ, ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५, ११९ म.पो अधि, १९२ अ १७९, १८४ मोटर वाहन अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा योगेश झोडापे ब न ५५८ मो. नं. ८६६८८४४६२३ हे करीत आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री अजय चांदखेडे यांचे मार्गदर्शनात सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, पोलीस हवालदार योगेश झोडापे, पोलीस नायक रविंद्र चटप, रंजन कांबळे, पोलीस शिपाई अंकुश मुळे, पोलीस मित्र धनराज शेंडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.


MH40CD6098
STOP
2023/04/28 06:05

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १६ किमी अंतरावर मौजा डुमरी कला निकोला बार जवळ जबलपूर हायवे येथे दिनांक २८/०४/२०२३ चे १०/०० वा. दरम्यान यातील **आरोपीं मारूती ओमनी गाडी एम. एच. –२६ एल.–२७१४ चा चालक व त्याचे सोबत १ अनोळखी इसम** यांनी संगणमत करून अवैध्यरित्या डबलु. सि. एल. चा कोळसा चोरी करून त्यांच्या ताब्यातील मारूती ओमनी गाडी एम. एच. –२६ एल.–२७१४ मध्ये भरून अंदाजे १२०० किलो कोळसा अंदाजे किंमती ८,४००/– रूपयाचा मुद्देमाल चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पराग शंकरराव श्रीखंडे, वय ३१ वर्ष, रा. नंदनवन नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/गंगाप्रसाद वरखडे ब. नं. ५०३ मो. नं.९७६३२१५४६५ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत पी एच सी रोड कोंढाळी येथे दिनांक २७/०४/२०२३ चे सकाळी ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– साधु सावजी राठोड, वय ३१ वर्ष, रा. मांडवा तह भिवापुर ह. मु पी एच सी रोड कोंढाळी हा लोमेश घाघरे यांचे घरी किरायाने राहत असून ऑर्डनेस फॅक्टरी येथे कामावर गेला असता नमूद घटना ता. वेळी व ठिकाणी कोणीतरी अनोळखी इसमाने घराचे दार बंद असल्याचे पाहून घराचे समोरील दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश करून घरातील आलमारीचे लॉक तोडुन अलमारीत ठेवलेली १) जुनी वापरती ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी किंमती अंदाजे १०.०००/– रू २) जुनी वापरती सोन्याची पोत अंदाजे किंमती ८०००/– रू व ३) जुने वापरते २ ग्रॅमचे मंगळसुत्र पोथ किंमती अंदाजे ४,०००/–रू असा एकुण २२०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अनोळखी इसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पंकज वाघोडे ठाणेदार पो.स्टे कोंढाळी हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत बस स्टॉप तिडंगी कळमेश्वर नागपूर येथे दिनांक २८.०४.२०२३ चे २०.४५ वा. दरम्यान फिर्यादी हे आपल्या पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफसह सरकारी वाहनाने पेट्रोलिंगकरीता फिरत असताना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली कि बस स्टॉप तिडंगी येथे एक इसम ज्याने अंगात कथ्थ्या रंगाचा टि शर्ट घातलेला आहे तो संशयास्पदरित्या हालचाली करीत आहे. यावरून पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ नमुद ठिकाणी गेले असता गुप्त बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचा इसम हा संशयास्पद हालचाली करताना दिसुन आला. त्याचे जवळ जावुन त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव– **दिलीप संतोष राजपुत वय ५५ वर्ष, रा. पारधी बेडा तिडंगी तह. कळमेश्वर जि. नागपुर** असे सांगितले व त्यास पंचासमक्ष तपासले असता त्याचे कमरेत मागच्या बाजुला पॅन्ट मध्ये खोसलेला एक लोखंडी चाकु मिळुन आला त्याचे वर्णन पुढील प्रमाणे एक लोखंडी फोल्डिंगचा जुना गंजलेला, एका बाजुने धारदार असलेला, निमुळता टोकदार चाकु ज्याची एकुण लांबी ५६ सेंमी, टोकापासुन मुठेपर्यंत ची लांबी २७ सेंमी, पात्याची मध्यभागी रुंदी ५ सेंमी, मुठेची लांबी २९ सेंमी असुन त्याची अंदाजे किंमती २००/–रू आहे. वर नमुद वर्णनाचा चाकु हा नमुद इसमाने बेकायदेशिररित्या विनापरवाना जवळ बाळगताना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पो.शि धोंडुतात्या बाजीराव देवकत्ते, वय २७ वर्ष, ब. नं. १५८ रा. पो.स्टे केळवद यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ महा. पो. कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. ६८९ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर